# महाराष्ट्र विधानसभा

# दिवसाच्या कामकाजाचा क्रम

**गुरुवार, दिनांक १४ डिसेंबर, २०१७**

**(सकाळी १०.०० ते १०.४५ वाजेपर्यंत)**

**लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

**(दिनांक १२ डिसेंबर २०१७ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक १ ते ४)**

(१) **सर्वश्री. अतुल भातखळकर, सुनिल शिंदे, राधाकृष्ण विखे-पाटील, विजय वडेट्टीवार, मो. आरिफ नसीम खान, अमित देशमुख, अमीन पटेल, त्र्यंबक भिसे, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री. सुनिल केदार, अमर काळे, अस्लम शेख, हर्षवर्धन सपकाळ, डॉ. संतोष टारफे, सर्वश्री. अब्दुल सत्तार, अजय चौधरी, ॲड. यशोमती ठाकूर, श्री. डी. पी. सावंत, डॉ. राहूल पाटील, सर्वश्री. संजय सावकारे, उदेसिंग पाडवी, पास्कल धनारे, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री. चरण वाघमारे, सुरेश भोळे, पृथ्वीराज चव्हाण, कालीदास कोळंबकर, डॉ. पतंगराव कदम, श्रीमती निर्मला गावित, सर्वश्री. कुणाल पाटील, जयकुमार गोरे, भाऊसाहेब कांबळे, प्रकाश फातर्पेकर, प्रकाश सुर्वे, डॉ संजय रायमुलकर, श्री.संजय पोतनीस वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई विद्यापीठाच्या ऑनलाईन मूल्यांकनामुळे अनेक पदविकांचे निकाल प्रलंबित राहिल्यामुळे विद्यार्थ्यांचे झालेले शैक्षणिक नुकसान, अनेक विद्यार्थाच्या उत्तरपत्रिका व पुरवण्या गहाळ झाल्यामुळे पुनर्मुल्यांकनामध्ये देखील विद्यार्थ्यांवर झालेला अन्याय, उत्तरपत्रिका मूल्यांकनासाठी विद्यापीठामार्फत नेमलेली कंत्राटदार कंपनी सक्षम नसल्यामुळे उत्तरपत्रिका मुल्यांकन प्रक्रियेसाठी उशीर झाला असल्याचे विद्यापीठाकडून कंपनीवर करण्यात आलेला आरोप, परंतु मुल्यांकनाकरिता नेमलेल्या मेरीट ट्रॅक कंपनीने मात्र विद्यापीठाने मनुष्य बळ पुरवले नसून तसेच संवादाच्या अभावामुळे निकालाचा अभूतपूर्व गोंधळ झाला असल्याचे विद्यापीठावर आरोप करणे, त्यामुळे एकीकडे विद्यार्थ्यांचे वर्ष वाया गेले असताना विद्यापीठ व कंपनी परस्पर विरोधी आरोप करत असल्याचे निदर्शनास येणे, उपस्थित विद्यार्थ्यांना अनुपस्थित दाखवणे, पदव्युत्तर अभ्यासक्रम प्रवेशाचा उडालेला बोजवारा, निकाला अगोदरच पदव्युत्तर प्रवेश देण्यास करण्यात आलेली सुरुवात, निकालास होणाऱ्या विलंबामुळे विद्यार्थ्यांचा विदेश शिक्षणाचा झालेला स्वप्नभंग, गुणपत्रिका तयार असून सहीमुळे झालेला विलंब, अर्धवट निकालाची ओढवलेली नामुष्की इत्यादी अनेक कारणांमुळे विद्यार्थी संघटनेने दि.१८ ऑगस्ट, २०१७ रोजी कलिना

संकुलमध्ये केलेले आंदोलन, मुल्यांकनासाठी विद्यापीठ व मेरिट ट्रॅक कंपनी यांच्यामध्ये करार न करता व त्यांना देण्यात आलेले कंत्राट, त्यामुळे संपूर्ण प्रक्रियेची सखोल चौकशी करून दोषी कंपनी व विद्यापीठ प्रशासन यांच्यावर कडक कारवाई करण्याची होत असलेली मागणी, तसेच भविष्यात असा गोंधळ होऊ नये याकरिता प्रशासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री. राधाकृष्ण विखे-पाटील, विजय वडेट्टीवार, मो. आरिफ नसीम खान, अमित देशमुख, अमीन पटेल, त्र्यंबक भिसे, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री. सुनिल केदार, अमर काळे, अस्लम शेख, हर्षवर्धन सपकाळ, डॉ. संतोष टारफे, श्री.अब्दुल सत्तार, डॉ. भारती लव्हेकर, ॲड.राहूल कुल, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील गरजू रुग्णांना शासकीय शुल्कामध्ये इच्छित स्थळी रक्त उपलब्ध व्हावे या उद्देशाने शासनाने माहे जानेवारी, २०१४ मध्ये "जीवन अमृत सेवा"(Blood on a call) सुरु करणे, तसेच तासाभराच्या आत थेट रुग्णालयात रक्त पुरविण्याची सुविधा मिळावी म्हणून १०४ या क्रमांकाची दूरध्वनी सेवा सुरु करण्यात येणे, या योजनेच्या विस्तारासाठी मुंबईत आठ रुग्णालयाच्या ठिकाणी रक्त साठवणूक केंद्रे स्थापन करण्याचा निर्णय देखील त्याचवेळी घेण्यात येणे, तथापि, सदर योजना सुरु होऊन ४ वर्षांचा कालावधी उलटून अद्याप एकही रक्त केंद्र उभारले गेले नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये निदर्शनास येणे, परिणामी शासकीय रक्त पेढ्यांमध्ये ८५० रुपयांना मिळणाऱ्या रक्त पिशवीसाठी खासगी रक्तपेढ्यांतून १४५० रुपयांना रक्त पिशवी विकत घ्यावी लागणे, त्यातच मुंबई शहर व उपनगरातील शासकीय आणि महापालिकेच्या रक्तपेढ्यांमधील तब्बल १ हजार ९२ युनिट्स म्हणजे जवळपास ३८२ लिटर रक्त रक्तपेढ्यांमधील अपुऱ्या व्यवस्थापनामुळे व नियोजनाअभावी वाया गेल्याचे दि.२० सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, शहर-उपनगरात केवळ विक्रमांच्या नावाखाली रक्तदान शिबिरे आयोजित करुन संकलित केलेल्या रक्ताची वैधता संपल्यामुळे बऱ्याचदा हे रक्त वाया जाणे, मुंबईमधील सेंट जॉर्जेस, नायर, कामा आणि व्ही.एन.देसाई या रक्तपेढ्यांच्या परवान्यांची वैधता माहे डिसेंबर, २०१७ अखेरीस संपणे तर परवाने नुतनीकरणाच्या प्रक्रियेत असणाऱ्या सर जे.जे.रुग्णालय, वांद्रे येथील भाभा रुग्णालय व टाटा रुग्णालयांच्या रक्तपेढ्यांचे वेळेत नुतनीकरण न झाल्यास, या रक्तपेढ्यांचा परवाना रद्द होण्याची निर्माण झालेली शक्यता, एकीकडे रक्तपेढ्यांमध्ये रक्त संक्रमण अधिकाऱ्यांची असलेली कमतरता तर दुसरीकडे खासगी रक्तपेढ्यांवर शासनाचे नियंत्रण नसल्यामुळे रुग्णांच्या नातेवाईकांना जास्त दराने रक्त घ्यावे लागत असून त्याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने अधिक चौकशी करुन रक्तपेढ्यांमधील वा आयोजित केलेल्या रक्तदान शिबीरांमधील गोळा झालेल्या रक्तसंकलनाबाबत व रक्तदर निश्चित करण्याबाबत धोरणात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(३) **सर्वश्री. भास्कर जाधव, मनोहर भोईर, जयंत पाटील, अजित पवार, दिलीप वळसे-पाटील, शशिकांत शिंदे, श्रीमती दिपिका चव्हाण, सर्वश्री. जितेंद्र आव्हाड, कुणाल पाटील, डी. एस. अहिरे, श्रीमती निर्मला गावित, ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री. डी. पी. सावंत, भारत भालके, डॉ. संतोष टारफे, सर्वश्री. विजय वडेट्टीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, सुनिल केदार, अमर काळे, अस्लम शेख, हर्षवर्धन सपकाळ, संदीप नाईक, पांडुरंग बरोरा, वैभव पिचड, नरहरी झिरवाळ, हसन मुश्रीफ, राणाजगजीतसिंह पाटील, सुरेश लाड, मकरंद जाधव-पाटील, दिपक चव्हाण, अमित देशमुख, डॉ. पतंगराव कदम, सर्वश्री. बाळासाहेब थोरात, अमीन पटेल, त्र्यंबक भिसे, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री. मो. आरिफ नसीम खान, पृथ्वीराज चव्हाण, कालीदास कोळंबकर, संग्राम थोपटे, जयकुमार गोरे, प्रा. विरेंद्र जगताप, सर्वश्री. भाऊसाहेब कांबळे, अब्दुल सत्तार, डॉ. सतीश पाटील,श्री. दत्तात्रय भरणे, डॉ.भारती लव्हेकर, सर्वश्री. हनुमंत डोळस, गणपत गायकवाड, किसन कथोरे, संजय केळकर, पंकज भुजबळ,ॲड. राहूल कुल, सर्वश्री.अबू आझमी, छगन भुजबळ, बाळासाहेब पाटील, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात गत वर्षभरात तब्बल १४,३६८ बालमृत्यु झाले असून त्यापैकी ३०१३ बालमृत्यु हे अवघ्या एका महिन्याच्या आतील नवजात बालकांचा झालेला असणे, नाशिक येथील जिल्हा रुग्णालयात इनक्यूबेटरसह अन्य अपूऱ्या सुविधांमुळे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये ५५ अर्भकांचा झालेला मृत्यू, रुग्णालयातील विशेष नवजात शिशु दक्षता विभागात १८ इनक्यूबेटर ठेवण्याची क्षमता असून एका इनक्यूबेटरमध्ये एकच नवजात बाळ ठेवणे बंधनकारक असताना चार-चार बालके ठेवण्यात आल्यामुळे नवजात बालकांना एकमेकांपासून संसर्गाचा निर्माण झालेला धोका, माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये उपचारासाठी दाखल झालेल्या ३५० अर्भकांपैकी ५५ बालकांचा व्हेंटिलेटरअभावी झालेला मृत्यू, रुग्णालयात टर्शरी केअर सेंटर नसल्यामुळे ऑक्सीजनची गरज भासणाऱ्या नवजात शिशुंचा व्हेंटिलेटरसह तज्ञ डॉक्टरांच्या अभावामुळे ऑक्सीजनअभावी झालेला मृत्यू, ठाणे सामान्य रुग्णालयातही यंत्रसामुग्रीच्या अभावामुळे गत सहा महिन्यांपासून व्हेंटिलेटर अभावी ४७ नवजात बालकांचा झालेला मृत्यु, संपूर्ण राज्यात एकाही जिल्हा रुग्णालयात व्हेंटिलेटरचा एकही संच उपलब्ध नसणे, परिणामी गंभीर स्थिती असलेल्या बालकांना मुंबई येथे पाठवावे लागणे, त्यामुळे आधीच नाजुक प्रकृती असलेली बालके दगावणे, परिचारीकांची तसेच न्यूओनॅटलॉजिस्ट यांची अपुरी संख्या, कृत्रिम श्वसन यंत्रणा नसणे, मूदतपूर्व प्रसूती झालेली अतिशय कमी वजनाची व श्वसनाचा त्रास होणाऱ्या बालकांवर उपचारासाठी तृतीय पातळीवर अति विशेष वैद्यकीय सुविधेची व्यवस्था केवळ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील रुग्णालयात परवानगी असताना ही व्यवस्था नाशिक जिल्ह्यातील एका खाजगी वैद्यकीय महाविद्यालयात त्रोटक स्वरुपात असणे, आरोग्य विभागातील अनेक पदे रिक्त असणे, नाशिक जिल्हा रुग्णालयात ठाणे, पालघर, नंदूरबार येथून आदिवासी भागातील बालके उपचारांसाठी येत असून त्यातील बहुतेक बालके कमी

वजनाची असणे, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करुन बालमृत्युचे प्रमाण थांबविण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(४) **सर्वश्री. हर्षवर्धन जाधव, राधाकृष्ण विखे-पाटील, विजय वडेट्टीवार, मो. आरिफ नसीम खान, अमित देशमुख, अमीन पटेल, त्र्यंबक भिसे, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री. सुनिल केदार, अमर काळे, अस्लम शेख, हर्षवर्धन सपकाळ, डॉ. संतोष टारफे, सर्वश्री. अब्दुल सत्तार, सुनिल प्रभू, मंगेश कुडाळकर, ॲड. यशोमती ठाकूर, श्री.डी.पी. सावंत, डॉ. राहूल पाटील, ॲड. भीमराव धोंडे, श्री.संतोष दानवे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सहकार मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात नोव्हेंबर २०१७ मध्ये साखर कारखान्यांच्या गळीत हंगामासाठी सुरु असलेली ऊस तोडणी, राज्यातील सर्व साखर कारखान्यांनी एफआरपी देणे बंधनकारक असणे, काही शेतकऱ्यांनी व संघटनांनी ३४०० रुपये प्रति टन केलेली मागणी, तथापि या रक्कमेमधूनच तोडणी व वाहतुक खर्च वजा करण्याचे धोरण असणे, त्याचबरोबर साखर उतारा ९.५ गृहीत धरुन २५५० रुपये हा एफआरपी ठरविण्यात येणे, उतारा वाढणे म्हणजे एफआरपी वाढणे असे असल्याने हा उतारा प्रत्यक्षात किती आहे हे पाहण्यासाठी शासनाने कारखान्यांवर कायदेशीर नियंत्रण ठेवणे गरजेचे असणे, तोडणी व वाहतुक खर्च आणि ऊसाचा उतारा हे साखर कारखान्यांच्या कक्षेतील विषय केल्यामुळे जाणुनबूजुन वसूली कमी दाखवणे, तसेच जास्तीची तोडणी व वाहतुक दाखवून ऊस बीलात जास्तीची कपात करणे या प्रकरणांव्दारे साखर कारखान्यांकडून होत असलेली शेतक-यांची पिळवणुक, कन्नड तालुक्यातील बारामती ॲग्रो या खाजगी साखर कारखान्याने केवळ २१०० रुपये प्रती टन ऊसाचे भाव जाहीर केलेले असणे, त्यामुळे ऊस तोडणी व वाहतुकीचा खर्चही शेतकऱ्यांच्या ऊस बीलातून कपात केला असल्याचे निदर्शनास येणे,गंगामाई साखर कारखान्याने २५०० रुपये भाव जाहीर केल्यामुळे तेथील शेतकऱ्यांनी सुरु केलेले आंदोलन, परिणामी शेतक-यांचे मोठया प्रमाणात होत असलेले आर्थिक नुकसान, मूळातच आर्थिकदृष्टया अडचणीत असलेला शेतकरी, अशा स्थितीत कारखान्यांकडून शेतक-यांना एफआरपी प्रमाणे ऊस दर न देता होत असलेली कपात, त्यामूळे शेतक-यांमध्ये पसरलेला असंतोष लक्षात घेता हे सर्व प्रकार रोखण्यासाठी व शेतक-यांना योग्य ऊस दर देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(दिनांक १३ डिसेंबर २०१७ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ५)**

(५) **सर्वश्री विजय वडेट्टीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, सुनिल केदार, अमर काळे,**

**अस्लम शेख, ॲड. यशोमती ठाकूर, डॉ. संतोष टारफे, श्री. डी.पी. सावंत, डॉ.शशिकांत खेडेकर, सर्वश्री. मो. आरिफ नसीम खान, अमित देशमुख, अमीन पटेल, त्र्यंबक भिसे, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री. हर्षवर्धन सपकाळ, अब्दुल सत्तार, शशिकांत शिंदे, जयदत्त क्षीरसागर, राजेश टोपे, सुरेश लाड, राहुल मोटे, दत्तात्रय भरणे, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री. अजय चौधरी, अजित पवार, दिलीप वळसे-पाटील, जयंत पाटील, जितेंद्र आव्हाड, भास्कर जाधव, संदीप नाईक, पांडुरंग बरोरा, वैभव पिचड, श्रीमती दिपिका चव्हाण, सर्वश्री. नरहरी झिरवाळ, हसन मुश्रीफ, राणाजगजीतसिंह पाटील, मकरंद जाधव-पाटील, दिपक चव्हाण, प्रकाश फातर्पेकर, सुरेश धानोरकर, किसन कथोरे, श्रीमती सुमन पाटील, श्री.राहुल जगताप, श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर, श्री. किशोर पाटील, श्रीमती ज्योती कलानी, सर्वश्री. पंकज भुजबळ, राजु तोडसाम, डॉ. सुजित मिणचेकर, श्री.उल्हास पाटील, डॉ. संजय रायमुलकर, डॉ. सतीश पाटील, सर्वश्री. योगेश घोलप, सुनिल प्रभू, हनुमंत डोळस, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री.शिरीष चौधरी, गणपत गायकवाड, बच्चु कडू, रवि राणा, सुनिल शिंदे, ॲड.भिमराव धोंडे, सर्वश्री.विनायकराव जाधव-पाटील, मोहन फड, ॲड.राहुल कूल, श्री.अबु आझमी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कृषि मंत्र्याचे लक्ष वेधतील:-**

"राज्यातील विदर्भ, मराठवाडा व खान्देशमधील १५ जिल्ह्यातील तब्बल ४० लाख हेक्टर वरील कापसाच्या बनावट बियाणांमुळे बोंड आळीच्या प्रादुर्भावाने शेतकऱ्यांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये निदर्शनास येणे, राज्यातील पाच नामांकित बीटी कॉटन बियाणांमध्ये पर्यावरण संरक्षण तरतुदीनुसार घातक असणारे "हर्बिसाईड टॉलरन्ट जिन्स" आढळून आल्याचे नागपूरच्या केंद्रीय कापूस संशोधन संस्थेने माहे डिसेंबर, २०१५ मध्ये शासनास अहवाल दिलेला असतांनाही शासनाने त्याकडे केलेले दुर्लक्ष, बंदी असतांनाही बनावट बियांणाची कृषी अधिकाऱ्यांच्या संगनमताने कृषी केंद्राच्या माध्यमातून मोठया प्रमाणात विक्री करण्यात येणे, कापसाचे सदोष बियाणे विकले गेल्याने शेतकऱ्यांवर नगदी पीक गमवण्याची आलेली वेळ, अगोदरच कर्जाच्या खाईत अडकलेल्या शेतकऱ्यांना पुन्हा लाखो रूपयांचे आर्थिक नुकसान सहन करावे लागल्याने त्यांच्यावर आलेली उपासमारीची वेळ, त्यामुळे शेतकऱ्यांना झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करुन प्रति हेक्टरी ५० हजार रूपये नुकसान भरपाई देण्याची होत असलेली मागणी, शेतकऱ्यांचे नुकसान करणाऱ्या या कंपन्याच्या विरोधात अद्याप कोणतीच कारवाई करण्यात न आल्याने शेतकऱ्यांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(सकाळी ११.०० वाजता)**

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

(१) **संसदीय कार्य मंत्री** : विधानसभेच्या सन २०१७ च्या तिसऱ्या (पावसाळी) अधिवेशनात दिनांक २४ जुलै, २०१७ ते ११ ऑगस्ट, २०१७ या कालावधीत मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री महोदयांनी विधानसभा सभागृहात दिलेल्या एकूण ४५१ आश्वासनांची यादी, तसेच सन २०१७ चे तिसरे (पावसाळी) अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर, पूर्तता करण्यात आलेल्या एकूण ४२३ आश्वासनांच्या पूर्ततेच्या विवरणपत्रांची यादी विधानसभेच्या सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

(२) **पणन मंत्री** : महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ यांचा सन २०१६-२०१७ या वर्षाचा एकोणसाठावा वार्षिक लेखा अहवाल व महालेखापाल यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा स्वतंत्र लेखा परिक्षण अहवाल (S.A.R.) सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : लोकलेखा समितीचा सत्ताविसावा अहवाल सादर करणे.**

**चार : विनंती अर्ज सभागृहास सादर करणे :-**

(१) **श्री.भरतशेठ गोगावले, वि.स.स.** : "**रायगड जिल्ह्यात भरतीच्या वेळी अनेक बंधारे फुटून समुद्राचे खारे पाणी शेतामध्ये व गावांमध्ये शिरल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याबाबत**" या विषयावरील विनंती अर्ज सभागृहास सादर करतील.

(२) **श्री.राजाभाऊ वाजे, वि.स.स.** : "**सिन्नर तालुक्यातील (जिल्हा नाशिक) गोदावरी सहकारी उपसा जलसिंचन योजनेस कर्जमाफी मिळणेबाबत**" या विषयावरील विनंती अर्ज सभागृहास सादर करतील.

(३) **ॲड.राहुल कुल, वि.स.स.** : "**वीर बाजी पासलकर (खडकवासला) (जिल्हा पुणे) प्रकल्पाच्या विविध समस्यांबाबत**" या विषयावरील विनंती अर्ज सभागृहास सादर करतील.

**पाच : स्थगन प्रस्तावाच्या सूचना – (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).**

**सहा : शासकीय विधेयके :**

**(अ) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(१)** (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री अमीन पटेल, हर्षवर्धन सपकाळ, विजय वडेट्टीवार, पृथ्वीराज चव्हाण, अस्लम शेख, अमर काळे, सुनिल केदार, राधाकृष्ण विखे पाटील, अजित पवार, दिलीप वळसे पाटील, जयंत पाटील, भास्कर जाधव, शशिकांत शिंदे, जितेंद्र आव्हाड, अबू आझमी, डॉ.सतीश पाटील, संदीप नाईक, बाळासाहेब पाटील, संग्राम जगताप, राजेश टोपे, दत्तात्रय भरणे, संजय कदम, वैभव पिचड, राणाजगजितसिंह पाटील, हसन मुश्रीफ, हनुमंत डोळस, विजय भांबळे, दिलीप सोपल, श्रीमती दिपीका चव्हाण, सर्वश्री जयदत्त क्षीरसागर, दिपक चव्हाण, सुरेश लाड, प्रा.वीरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २५ - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०१७ नापसंत करते."

(ख) **सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६२ - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१७.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ६२ - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, हर्षवर्धन सपकाळ, राहुल बोंद्रे, विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ६२ - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१७

विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ६२ - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत प्रा.वीरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ६२ - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(२)** (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री अमीन पटेल, हर्षवर्धन सपकाळ, विजय वडेट्टीवार, पृथ्वीराज चव्हाण, अस्लम शेख, अमर काळे, सुनिल केदार, राधाकृष्ण विखे पाटील, अजित पवार, दिलीप वळसे पाटील, जयंत पाटील, भास्कर जाधव, शशिकांत शिंदे, जितेंद्र आव्हाड, अबू आझमी, डॉ.सतीश पाटील, संदीप नाईक, बाळासाहेब पाटील, संग्राम जगताप, राजेश टोपे, दत्तात्रय भरणे, संजय कदम, वैभव पिचड, राणाजगजितसिंह पाटील, हसन मुश्रीफ, हनुमंत डोळस, विजय भांबळे, दिलीप सोपल, श्रीमती दिपीका चव्हाण, सर्वश्री जयदत्त क्षीरसागर, दिपक चव्हाण, सुरेश लाड, प्रा.वीरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २३ - महाराष्ट्र महानगरपालिका (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०१७ नापसंत करते."

(ख) **सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६३ - महाराष्ट्र महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ६३ - महाराष्ट्र महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, हर्षवर्धन सपकाळ, राहुल बोंद्रे, विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ६३ - महाराष्ट्र महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ६३ - महाराष्ट्र महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत प्रा.वीरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ६३ - महाराष्ट्र महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(३)** (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री अमीन पटेल, हर्षवर्धन सपकाळ, विजय वडेट्टीवार, पृथ्वीराज चव्हाण, अस्लम शेख, अमर काळे, सुनिल केदार, राधाकृष्ण विखे पाटील, अजित पवार, दिलीप वळसे पाटील, जयंत पाटील, भास्कर जाधव, शशिकांत शिंदे, जितेंद्र आव्हाड, अबू आझमी, डॉ.सतीश पाटील, संदीप नाईक, बाळासाहेब पाटील, संग्राम जगताप, राजेश टोपे, दत्तात्रय भरणे, संजय कदम, वैभव

पिचड, राणाजगजितसिंह पाटील, हसन मुश्रीफ, हनुमंत डोळस, विजय भांबळे, दिलीप सोपल, श्रीमती दिपीका चव्हाण, सर्वश्री जयदत्त क्षीरसागर, दिपक चव्हाण, सुरेश लाड, प्रा.वीरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २७ — महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०१७ नापसंत करते."

(ख) **सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६५ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (चौथी सुधारणा) विधेयक, २०१७.**

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ६५ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (चौथी सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, हर्षवर्धन सपकाळ, राहुल बोंद्रे, विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ६५ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (चौथी सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ६५ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (चौथी सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत प्रा.वीरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ६५ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (चौथी सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन

दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(४)** (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री अमीन पटेल, हर्षवर्धन सपकाळ, विजय वडेट्टीवार, पृथ्वीराज चव्हाण, अस्लम शेख, अमर काळे, सुनिल केदार, अजित पवार, दिलीप वळसे पाटील, जयंत पाटील, भास्कर जाधव, शशिकांत शिंदे, जितेंद्र आव्हाड, अबू आझमी, डॉ.सतीश पाटील, संदीप नाईक, बाळासाहेब पाटील, संग्राम जगताप, राजेश टोपे, दत्तात्रय भरणे, संजय कदम, वैभव पिचड, राणाजगजितसिंह पाटील, हसन मुश्रीफ, हनुमंत डोळस, विजय भांबळे, दिलीप सोपल, श्रीमती दिपीका चव्हाण, सर्वश्री जयदत्त क्षीरसागर, दिपक चव्हाण, सुरेश लाड, प्रा.वीरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २६ - महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अध्यादेश, २०१७ नापसंत करते."

(ख) **सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६६ - महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०१७.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ६६ - महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, हर्षवर्धन सपकाळ, राहुल बोंद्रे, विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ६६ - महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत प्रा.वीरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ६६ - महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(५)** (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री विजय वडेट्टीवार, अस्लम शेख, अमर काळे, सुनिल केदार, राधाकृष्ण विखे-पाटील, अबू आझमी, प्रा.वीरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २८ — महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २०१७ नापसंत करते."

(ख) **सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६८ - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१७.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री विजय वडेट्टीवार, अस्लम शेख, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ६८ - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत प्रा.वीरेंद्र जगताप, श्री.हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ६८ - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(ब) विधानसभेने संमत केलेले विधेयक महाराष्ट्र विधानसभा नियमातील नियम १४१(१) अन्वये पुन्हा संमत करणे :-**

सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४१ — महाराष्ट्र कृषी उत्पन्न

**(बुधवार, दिनांक १३ डिसेंबर, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव.)**

**सात : डॉ.अनिल बोंडे, सर्वश्री. सुनिल प्रभू, राजेंद्र पाटणी, हर्षवर्धन जाधव, रणधीर सावरकर, राजेश क्षीरसागर, सुधाकर देशमुख, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री. सुधाकर कोहळे, किशोर पाटील, चरण वाघमारे, ज्ञानराज चौगुले, प्रशांत बंब, डॉ. शशिकांत खेडेकर, सर्वश्री. समीर कुणावार, मंगेश कुडाळकर, डॉ.पंकज भोयर, सर्वश्री. अनिल कदम, विकास कुंभारे, डॉ. सुजित मिणचेकर, सर्वश्री. सुधीर पारवे, नारायण पाटील, डॉ.देवराव होळी, सर्वश्री.सुभाष साबणे, नागेश पाटील-आष्टिकर, श्रीमती सिमा हिरे, सर्वश्री.राजाभाऊ वाजे, संतोष दानवे, राजू तोडसाम, शंभुराज देसाई, चंद्रदिप नरके, उल्हास पाटील, डॉ.जयप्रकाश मुंदडा, सर्वश्री. अनिल बाबर, हेमंत पाटील, चंद्रकांत सोनावणे, सुरेश धानोरकर, हरिष पिंपळे, डी. मल्लिकार्जुन रेड्डी, सुधाकर भालेराव, तान्हाजी मुटकुळे, वि.स.स यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यात विदर्भातील सर्व जिल्हे व मराठवाडयात पडलेला कमी पाऊस व त्यामुळे निर्माण झालेली परिस्थिती, या भागातील सिंचनाचा अनुशेष वेगाने पूर्ण करण्याची गरज, विदर्भातील अपुरे सिंचन प्रकल्प पूर्ण करण्याकरिता केंद्राच्या सहाय्याने तयार केलेली 'बळीराजा जलसंजीवनी योजना' तातडीने कार्यान्वित करण्याची आवश्यकता, बेंबळा प्रकल्पाच्या कामाला देण्यात आलेली गती, माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांनी भूमीपुजन केलेल्या गोसीखुर्द प्रकल्पाच्या सर्व परवानग्या प्राप्त करुन प्रकल्पाची किंमत केंद्र शासनाने निश्चत करण्यासाठी झालेली कार्यवाही, अपुऱ्या पावसामुळे मूग, उडीद, सोयाबीन, कापुस, तूर व हरभरा इ. पिकांचे उत्पादन ३० ते ४० टक्क्यांवर येणे, डुक्कर, हत्ती, इ. जनावरांमुळे होणारे शेतीचे नुकसान रोखण्याच्या दृष्टीने प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता, पाणंद रस्त्यांचे बांधकाम व मजबुतीकरण प्राधान्याने करणे, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या उद्देशाने उत्पादन खर्च कमी करणे, नैसर्गिक व सेंद्रीय शेती आणि फळबागांच्या लागवडीस प्रोत्साहन देणे, संत्राउद्योग, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मत्सव्यवसाय इ. शेतीच्या जोडधंद्यांना प्रोत्साहन देणाऱ्या योजना कार्यान्वित करणे, शेतमालाला किमान हमीभावाप्रमाणे दर मिळण्याची व जेथे कमी भाव असेल तेथे अनुदान देण्याची गरज, जलयुक्त शिवार योजनेमुळे शाश्वत सिंचनाच्या सुविधा उभारण्यासाठी मोठ्या प्रमाणात आलेली गती, ही योजना अधिक प्रभावी करण्याकरिता या योजनेच्या अटी व निकष शिथिल करण्याची आवश्यकता, कृषीपंपांना दिवसा १२ तास वीज उपलब्ध करण्याच्या दृष्टीने 'सोलर फिडरची योजना' कार्यान्वित करणे व वीजपंप जोडणीच्या प्रलंबित अर्जांचा माहे डिसेंबर, २०१७ पर्यंत शीघ्रगतीने निपटारा करण्याची आवश्यकता, राज्यातील वीज वितरण व्यवस्था अधिक मजबुत करण्यासाठी नविन उपकेंद्र, रोहित्र व पायाभूत सुविधा उपलब्ध करण्याची

आवश्यकता, सिंचन अनुशेषाच्या भागात अधिक अनुदान देण्याची गरज, नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेमध्ये शासनाने ४ हजार ५०० कोटी रुपये उपलब्ध करुन दिले असणे, त्यामुळे ५ हजार गावांमध्ये शेती उत्पादन वाढून शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावणे व शेतमालाला बाजारपेठ उपलब्ध झाली असणे, आत्महत्याग्रस्त ६ जिल्हयांपेक्षा एकटया मुंबईला अधिक कर्जमाफी देण्याचे पूर्वीच्या शासनाचे धोरण असताना अवघ्या ५ महिन्यात संपूर्ण राज्यभरात कर्जमाफीची प्रक्रिया गतीने पूर्णत्वाकडे येणे, कृषी विभागातील रिक्त पदे तातडीने भरणे व आशाच्या धर्तीवर शेतकरी मित्र नेमण्याची आवश्यकता, केंद्र शासनाचे नदीजोड प्रकल्प राज्यात कार्यान्वित करण्याची आवश्यकता, एमआरईजीएस मध्ये मोठ्या प्रमाणात सिंचन विहिरी करण्याची आवश्यकता, कृषीमालावर आधारीत प्रक्रिया उद्योग उभारणीसाठी विशेष आर्थिक क्षेत्र उभे करण्याची आवश्यकता, विदर्भाच्या समग्र विकासाला वेग देण्याची आवश्यकता, अमरावती भागात उभारण्यात येणाऱ्या टेक्सटाईल पार्कला अधिक गती देण्याची आवश्यकता, मोर्शीत संत्रा प्रक्रिया प्रकल्प सुरु करणे व संत्रा धोरण जाहीर करणे, मिहानमध्ये मोठ्या संख्येने येत असलेली गुंतवणूक, छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना यशस्वीपणे व पारदर्शकरित्या राबविल्यामुळे शेतकरी पुन्हा कर्ज घेण्याकरिता पात्र होणे, मागील ३ वर्षात शासनाने शेतीमधील गुंतवणूक वाढविल्यामुळे शेतीचा विकास दर सतत नकारात्मक राहत असताना हा दर प्रथमच + १२.५ टक्क्यांवर नेण्यास शासनास आलेले यश, राज्यातील शेतकरी कायमस्वरुपी स्वबळावर उभा राहू शकेल व त्याला भविष्यात कर्ज घेण्याची पाळी येणार नाही या दृष्टीने योजना आखून त्या तातडीने कार्यान्वित करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**आठ : सर्वश्री. राधाकृष्ण विखे पाटील, अजित पवार, पृथ्वीराज चव्हाण, दिलीप वळसे पाटील, जयंत पाटील, विजय वडेट्टीवार, डॉ. पतंगराव कदम, सर्वश्री बाळासाहेब थोरात, शशिकांत शिंदे, प्रा. विरेंद्र जगताप, सर्वश्री. जयदत्त क्षीरसागर, जितेंद्र आव्हाड, प्रा.वर्षा गायकवाड, सर्वश्री. भास्कर जाधव, अब्दुल सत्तार, अबु आझमी, अमिन पटेल, सुनिल केदार, दिलीप सोपल, गोपालदास अग्रवाल, ॲड यशोमती ठाकूर, सर्वश्री. मो. आरिफ नसीम खान, डी. एस. अहिरे, राहुल मोटे, डि. पी. सावंत, हसन मुश्रीफ, मधुकरराव चव्हाण, राजेश टोपे, बसवराज पाटील, वसंतराव चव्हाण, रणजित कांबळे, डॉ. संतोष टारफे, श्रीमती दिपीका चव्हाण, सर्वश्री. कुणाल पाटील, काशिराम पावरा, हर्षवर्धन सपकाळ, विजय भांबळे, राहुल बोंद्रे, अमर काळे, अमित झनक, कु. प्रणिती शिंदे, श्रीमती अमिता चव्हाण, सर्वश्री भाऊसाहेब कांबळे, शेख आसिफ शेख रशीद, श्रीमती निर्मला गावित, सर्वश्री अस्लम शेख, त्र्यंबक भिसे, संग्राम थोपटे, जयकुमार गोरे, भारत भालके, सिध्दाराम म्हेत्रे, मनोहर नाईक, नरहरी झिरवाळ, अमित देशमुख, संदिप नाईक, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"दिनांक २४ जून, २०१७ रोजी राज्यातील ८९ लाख शेतकऱ्यांचे ३४ हजार ३३ कोटी रुपयांचे कर्ज माफ करण्याच्या शासनाने जाहीर केलेल्या निर्णयानुसार कर्जमाफी करण्यासाठी २२ सप्टेंबर, २०१७ अखेर ५७ लाख शेतकऱ्यांनी अर्ज दाखल केल्याची माहिती सहकार विभागाने देणे, त्यापैकी २ लाख ४१ हजार शेतकऱ्यांचे आधार क्रमांक नसल्याने त्यांना कर्जमाफी देण्याबाबत झालेली अडचण, कर्जमाफीची सवलत घेऊ इच्छिणाऱ्यांमध्ये ८६ लाख पात्र तर १० लाख बनावट शेतकरी असल्याचा शासनाने केलेला दावा, माहे ऑक्टोबर, २०१७ अखेर कर्जमाफीची रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्याचे आश्वासन देऊनही त्याची अंमलबजावणी न होणे, माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या हाती कर्जमाफी योजनेचा असलेला सुकाणू, या फसव्या कर्जमाफीमुळे राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या कमी न होता वाढत जाणे, मावा व तुडतुडा या सारख्या किडींमुळे धान पिकाचे मोठ्या प्रमाणात झालेले नुकसान, गुलाबी बोंड अळीमुळे ३० लाख हेक्टरवरील कापसाचे क्षेत्र बाधित होणे, सदर नुकसानीचे सर्वेक्षण करण्यात दिरंगाई केल्यामुळे बाधित क्षेत्राचे पंचनामे करण्यात येणाऱ्या अडचणी, राज्यात आदिवासींवर सातत्याने होणारे अन्याय, कोटयवधीचा खर्च होऊनही विकास न होणे, आश्रमशाळा, वसतीगृहातील समस्या या प्रकरणी अनेकदा आंदोलने करुनही त्याकडे झालेले दुर्लक्ष, वन हक्क दाव्याची हजारो प्रलंबित प्रकरणे, कुपोषणामुळे हजारो बालमृत्यू होऊनही त्याची दखल न घेणे, आश्रमशाळातील शिक्षकांची रिक्त पदे, वसतीगृहाची दूरवस्था, धोकादायक इमारतीत भरणा-या शाळा, प्रतिवर्षी १८०० कोटी रुपयांची तरतुद करुनही ८० टक्के विद्यार्थ्यांची होणारी गळती, आरोग्याचा निर्माण झालेला प्रश्न, आदिवासींच्या शाळेतील विद्यार्थ्यांचे होणारे मृत्यू रोखण्यास नियुक्त केलेल्या डॉ. सुभाष सांळुखे समितीच्या अहवालाची अंमलबजावणी न होणे, बहुसंख्य आदिवासी, शिक्षण हक्क, घरकुल योजना, रेशनिंग सुविधा, वीज यापासून वंचित असणे, ओबीसी समाजाच्या क्रिमीलेयरची वार्षिक उत्पन्नमर्यादा केंद्र शासनाप्रमाणे आठ लाख करण्याची होत असलेली

मागणी, राज्यातील ग्रामीण रुग्णालये व प्राथमिक आरोग्य केंद्रांमधील रिक्त पदांमुळे कोलमडलेली आरोग्य व्यवस्था, प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या तयार इमारती विनावापर राहणे, सामाजिक न्याय विभागांतर्गत मागासवर्गीय सहकारी उद्योग संस्थांच्या अनुदानामध्ये होत असलेला गैरप्रकार, पारधी वस्ती जोड रस्त्यांना निधी देणे बंद करणे, ग्रामीण भागातील रस्त्यांसाठी लांबीनुसार निधी न मिळाल्यामुळे तालुकानिहाय निर्माण झालेला रस्त्यांचा अनुशेष, राज्यातील बहुसंख्य पात्र व गरजू इतर मागासवर्गीय बांधव घरकुलांपासून वंचित राहणे, ओखी वादळामुळे मुंबईसह कोकण किनारपट्टीवर मच्छिमारांच्या बोटी, मासेमारी साहित्य व त्यांच्या घरांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होणे, सुकविण्यासाठी ठेवलेले मत्स्योत्पादन वाहून जाणे, वादळामुळे मच्छिमार वस्तीत पाणी शिरल्याने घरांची मोठ्या प्रमाणात पडझड होऊन आंबा, काजू, नारळी, पोफळी, मसाल्याची पिके व इतर फलोत्पादक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणे, पाण्यापासून संरक्षण करण्यासाठी बांधण्यात आलेले बंधारेही वादळामुळे वाहून जाणे, परिणामी स्थानिक वस्त्यांना धोका निर्माण होणे, या सर्व बाबतीत सर्वेक्षण करुन दुरुस्तीची कामे करण्याची निर्माण झालेली गरज, ऑनलाईन व्यवस्थेत निर्माण झालेल्या अडचणींमुळे वर्ष संपत आले तरी मागासवर्गीयांना फ्री शीप व शिष्यवृत्तीची रक्कम न मिळणे, ज्येष्ठ नागरिकांना मिळणारी अपमानास्पद वागणूक, विविध सेवा पुरविण्याच्या नावाखाली काढण्यात आलेल्या निविदांमध्ये ३५० कोटींचा झालेला घोटाळा, समृध्दी महामार्गासाठी शेतकऱ्यांचा विरोध डावलून सक्तीने जमिनी संपादनाची करण्यात येणारी कार्यवाही, शेतकऱ्यांमध्ये शासनाप्रती निर्माण झालेला प्रचंड असंतोष, याप्रकरणी शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**नऊ : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(दिनांक १२ डिसेंबर, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या तथापि, चर्चा न झालेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना (सूचना क्र. १ व २)**

**(१) श्री. राहुल कुल, वि.स.स.**

"**राज्यातील अनेक ग्रामपंचायतींचे पाणीपुरवठा योजनेचे प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत**" या विषयावरील **श्री. राहुल कुल, वि.स.स.** यांचा दिनांक १० ऑगस्ट, २०१७ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ३४२ मधील प्रश्न क्रमांक ८०१३६ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**(२) श्री. हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स.**

"**बुलढाणा शहरातील रस्त्यांची दूरवस्था झाल्याबाबत**" या विषयावरील

**श्री. हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स** यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ८५८६२ ला दिनांक २५ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**(दिनांक १० ऑगस्ट, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली तथापि, चर्चा न झालेली अर्धा-तास चर्चेची सूचना (सूचना क्र. ३)**

(३) **श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी तालूक्याची सन १८७४ मध्ये तसेच सावली तालुक्याची सन १९९२ मध्ये निर्मिती होऊनही अद्यापि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ स्थापन न होणे, ब्रम्हपूरी व सावली हे दोन्ही तालुके धान उत्पादक म्हणून राज्यात प्रसिध्द असून या ठिकाणी एकही उद्योजक उद्योग सुरू करण्यास तयार नसल्यामुळे बेरोजगारांचे रोजगारासाठी शहराकडे होत असलेले स्थलांतर, प्रत्येक तालुका मुख्यालयाच्या ठिकाणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ स्थापन करावे असा शासनाचा निर्णय असतांनाही या दोन्ही ठिकाणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ स्थापन न केल्यामुळे नागरीकांमध्ये पसरलेला असंतोष, परिणामी ब्रम्हपूरी आणि सावली येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ स्थापन करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(मंगळवार, दिनांक १२ डिसेंबर, २०१७ रोजीच्या बॅलटव्दारे ठरविण्यात आलेल्या व प्राथम्यक्रमानुसार दर्शविण्यात आलेल्या सूचना) (सूचना क्र. ४ व ५)**

(४) **श्रीमती ज्योती कलानी, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"एम.आय.डी.सी. उल्हासनगर मधील उद्योगांचे व जिन्स उद्योगाचे विषारी रसायन मिश्रीत पाणी वालधुनी नदीत सोडण्यात येत असल्यामुळे सर्वदूर दुर्गंधी पसरणे, उल्हासनगरमधील उद्योगांना शुध्दीकरणाची व्यवस्था परवडणारी नसल्यामुळे जलशुध्दीकरणासाठी C.E.P.T. प्लांट उभारण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याची होत असलेली मागणी, कल्याण, अंबरनाथ, उल्हासनगर, बदलापूर शहरातील सांडपाणी S.P.T. शुध्दीकरणाच्या प्रकल्पामधून नदीत सोडण्याची आवश्यकता, उल्हासनगर शहरामधील भूमीगत गटार योजनेसाठी ४५० कोटी रुपये मंजूर होऊनही कामास अद्याप सुरुवात न झाल्यामुळे नागरीकांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिकिया."

(५) **श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"सिंदेवाही (जि. चंद्रपूर) येथील तहसिल इमारत जुनी असून वाढत्या कामकाजाच्या व्यापामुळे सदर इमारत अपुरी पडणे, तालुका स्तरावरील सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालये एकाच इमारतीमध्ये सुरू करण्याकरिता सिंदेवाही येथे मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्यासाठी १२ कोटी ३५ लाख रुपयांचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभाग, चंद्रपूर यांनी शासनास सादर करुन सुमारे दीड वर्षाचा कालावधी होऊनही त्यावर कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, परिणामी नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष, सिंदेवाही येथे मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाच्या प्रस्तावास मान्यता देऊन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : १३ डिसेंबर, २०१७

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.